# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**विशेष महासभा दि. २१/०६/२००८**

आज शनिवार दि. २१/०६/२००८ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची विशेष महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०३ दि. १७/०६/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | नरेंद्र मेहता | महापौर |
| २) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | उपमहापौर |
| ३) | पाटील जयंत महादेव | सभागृह नेता |
| ४) | वैती चंद्रकांत सिताराम | विरोधी पक्ष नेता |
| ५) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ६) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ७) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ८) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ९) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १०) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| ११) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १२) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १३) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १४) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १५) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १६) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १७) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १८) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| १९) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| २०) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २१) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २२) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २३) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २४) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २५) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २६) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २७) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २८) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २९) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| ३०) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ३१) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३२) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३३) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३४) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ३५) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३६) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३७) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३८) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३९) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४०) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ४१) | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | सदस्य |
| ४२) | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | सदस्य |
| ४३) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४४) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४५) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४६) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४७) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ४८) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४९) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ५०) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ५१) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ५२) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ५३) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५४) | भाटकर प्रेरणा प्रमोद | सदस्या |
| ५५) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५६) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५७) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५८) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५९) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ६०) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ६१) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६२) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ६३) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६४) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६५) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६६) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६७) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६८) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ६९) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ७०) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ७१) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७२) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ७३) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७४) | संजय पांगे | सदस्य |
| ७५) | अरुण कदम | सदस्य |
| ७६) | प्रकाश दुबोल | सदस्य |
| ७७) | आसिफ पटेल | सदस्य |

**गैरहजर सदस्य - निरंक**

| | | |
|---|---|---|
| १) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सभापती, स्थायी समिती |
| २) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ३) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ५) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ६) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ७) | परशुराम पाटील | सदस्य |

**रजेचा अर्ज - निरंक**

(वंदे मातरम या राष्ट्रीय गीताने सभेला सुरुवात करण्यांत आली.)

**मा. महापौर :-**

सचिवजी सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २५, जकात कर वसूलीचा कालावधी संपल्यानंतर मुदतवाढ देण्याबाबत. (दि. १७/०६/२००८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण क्र. १८)

**जयंत पाटील :-**

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, "ड" वर्ग महानगरपलिकेचा जकात कर बंद करुन उपकर चालू करण्याचे शासनाने धोरण अवलंबिले आहे. त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने आवश्यकती पुर्व तयारी सुरु केली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचा सन २००७-०८ सालातील जकात वसुलीचा ठेका दि. २२/०६/२००८ रोजी मध्यरात्री संपणार आहे.

प्रकरणात तत्वतः ३१ जुलै २००८ मध्यरात्री (१ ऑगस्ट २००८) पासुन उपकराची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे. तोपर्यंत महानगरपालिकेने जकात कर वसुली करणे अपेक्षित आहे. महानगरपालिकेकडे कर्मचाऱ्याची संख्या कमी असल्यामुळे महानगरपालिकेकडून जकात कर वसुल करुन घेतल्यास अपेक्षित उत्पन्न मिळणार नाही. त्यामुळे मा.स्थायी समिती ठराव क्र.४२ दि.२९/०२/२००८ व मा.महासभा ठराव क्र.३४ दि.१९/०३/२००८ च्या अन्वये निश्चित केलेल्या दराने व्यापारी व नागरीकांकडून जकात कर वसुली करण्यास आणि अपेक्षित देकार रक्कम रु.९२ कोटी प्रमाणे प्रति हफ्ता येणारी रक्कम रु.१,८४,००,०००/- (रु. एक कोटी चौऱ्याऐंक्षी लाख मात्र) एवढी महानगरपालिकेस नियमित भरण्याच्या अटीवर जकात वसुली ठेकेदार मे. कोणार्क इन्फ्रा.लि. यांना मुदत वाढ देणे योग्य राहील.

सदर मुदतवाढ दि.२३/०६/२००८ ते दि.३१/०७/२००८ पर्यंत ३९ दिवसांसाठी असून या कालावधीसाठी एकूण रक्कम रु.९,८३,०१,३७२/- (रु. नऊ कोटी त्र्याऐंशी लाख एक हजार तिनशे बहात्तर मात्र) एवढी महानगरपालिकेस मिळणार आहे. यास्तव जकात दर वाढीची नोटीस प्रसिध्दी करुन व सदर प्रकरण विशेष महासभेला ठेवून अंतिम मंजुरी घेउुन दि.३१/०७/२००८ पर्यंत जकात वसुली ठेकेदार मे.कोणार्क.इन्फ्रा.लि. यांना मुद्त वाढ देउुन कार्यादेश देण्यास मा.स्थायी समितीने ठराव क्र. १८ दि.१७/०६/२००८ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सदर ठेकेदार मे.कोणार्क .इन्फ्रा.लि. यांना दि.२३/०६/२००८ ते दि. ३१/०७/२००८ पर्यंत किंवा उपकर लागू होईपर्यंत जकात वसुली करण्यास मुद्त वाढ देउुन कार्यादेश देण्यास विशेष मा. महासभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**मिलन पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**चंद्रकांत वैती :-**

ही जकातवाढ देताना आज जकातीला मुदतवाढ द्यायची आहे. त्याच्यासाठी या विशेष महासभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. मा. महापौर महोदय, आयुक्त साहेब आपण साधारणपणे १२ दरसुची वाढविलेल्या आहेत. काही ठिकाणी जकातीचे टक्के वाढविलेले आहेत आणि सर्वसाधारणपणे थम रूल आहे. शासनाचा एक नियम आहे की, कुठचेही पुढचे टेंडर येताना त्याच्यामध्ये १० टक्के वाढ आपण अपेक्षित धरत असतो. तशी १० टक्के वाढ अपेक्षित आपण अर्थसंकल्पामध्ये धरली होती आणि अर्थसंकल्पामध्ये ९२ करोड रू आपल्याला जकातीच्या पोटी या महानगरपालिकेला मिळतील आणि त्याचा विनियोग या शहराच्या विकासासाठी होईल अशी आपली भावना आहे आणि त्या अनुषंगाने आपण हे केले होते. त्याच्याप्रमाणे असे होते की, शासनाकडून महाराष्ट्रातील १४ (ड) वर्ग महानगरपालिकांमध्ये ही जकात रद्द करून त्या जागी सेस लावण्याचा शासनाचा एक प्रयत्न होता आणि तो आपल्या कानावर होता म्हणून आपण असा एक ढोबळ अंदाज लावला की, जर ९२ करोड रू. जकातीची रक्कम दाखविली तर उद्या सेस वसुली मध्ये जर काही प्रॉब्लेम आला किंवा शासनाचे कुठचेही धोरण बदलले आणि शासनाने ठरविले की, या संदर्भातला विकास निधी हा शासनाकडून आपल्याला मिळणार आहे तर तो आपल्याला ९२ करोडच्या तुलनेत मिळणार आहे. मग आपण ७४ करोडच्या तुलनेत मागण्यापेक्षा ९२ करोडच्या तुलनेत मागतोय. पण उद्या कर्मधर्म सेवेने असे झाले की, ही जकात रद्दच झाली नाही. शासन स्तरावर असा काहीतरी निर्णय झाला तर मग पुन्हा फार मोठा गोंधळ या परिसरात होणार आहे. आपण आता असे धरू या की, जकात ३१ जुलैला मध्यंतरी १२.०० वा. बंद होते. १ ऑगस्ट पासुन सेस अर्थात उपकर लावण्यासंदर्भात आपल्याला हालचाली कराव्या लागतील असे धरले तर आपल्याकडे उरलेले ३९ दिवस आहेत. ३९ दिवसामध्ये जर आपण चाढीव दरानेही जकाज लावण्याचा प्रयत्न केला तर जकात ठेकेदार हा ला १२ सुची ज्या आहेत त्याचे दर वाढवून टाकणार. ७ दिवसाचे नोटिफिकेशन त्याने प्रसिद्ध करायचे असते आणि मग त्यासाठी पुन्हा व्यापाऱ्यांमध्ये नुसता जकात व्यापारी भरतो अशातला भाग नाही. तर मिरा भाईंदर शहरामध्ये राहणाऱ्या कुठल्याही नागरिकाने किंवा नगरसेवकाने कोणीही, काहीही सामान बाहेरून आणले तर त्याच्यावर जकात लागते मग ती ४ टक्क्याने लागणार, साडेचार टक्क्याने लागणार पुन्हा गोंधळ होणार म्हणून आमची अशी सुचना या ठरावाला आहे की, ७४ करोड रूपयाची

आपली जी मागची जकात होती त्या जकातीला अनुसरूनच त्याच दराने जकात वसुली ३९ दिवसात करावी अशी माझी सुचना आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, जकाती बद्दल मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये नाही तर पुर्ण ज्या ज्या महापालिका आहेत त्याच्यामध्ये ऑक्ट्रॉय जाणार म्हणून जो आदेश महाराष्ट्र शासनाने काढला होता त्यानंतर बहूतेक सर्व महापालिकेमध्ये हा गोंधळ आहे की, काय केले पाहिजे? दि. ०७/०५/२००८ म्हणजे दोन आठवड्यापूर्वी जेव्हा स्थायी समितीमध्ये ही सभा होती त्यावेळी जकातीचा विषय नव्हता आणि तेव्हा मी हा विषय उपस्थित केला की, आता १५ दिवस राहिलेले आहेत तर महापालिकेने ऑक्ट्रॉय बद्दल काय निर्णय घेतलेला आहे? त्यावेळी उपायुक्त (मु.) श्री. खतगांवकर साहेबांनी सांगितलेले आहे की, जेव्हा स्थायी समितीमध्ये मी हा विषय उपस्थित केला होता की, महापालिकेचे १५ दिवसामध्ये ऑक्ट्रॉय जाणार आहे. याबद्दल महानगरपालिकेने काय निर्णय घेतलेला आहे. शासनाकडून महापालिकेला कुठलेही पत्र आलेले आहे का? त्यावेळी उपायुक्त खतगांवकर साहेब त्याठिकाणी होते त्यांनी मला सांगितले की, अजुनही महाराष्ट्र शासनाकडून कुठलेही पत्र आलेले नाही. आम्ही एक दोन दिवसात तपासणी करू. मी हे ही बोललो की, अनेक वर्तमान पत्रामध्ये ही गोष्ट आलेली आहे की, मुदतवाढ महाराष्ट्र शासनाने दिलेली आहे. ही बाब कितपर्यंत सत्य किंवा असत्य आहे? तेव्हा उपायुक्त श्री. खतगांवकर साहेबांनी सांगितले की, वर्तमान पत्रामध्ये आले तरी आमच्याकडे असा कुठला ही आदेश महाराष्ट्र शासनाचा नाही. त्यानंतर १४ तारखेला स्थायी समिती झाली. त्या स्थायी समितीच्या सभेमध्ये जेव्हा हा विषय आला तेव्हा त्या टिपणीमध्ये आपल्या महापालिकेने ७ तारखेला ठेकेदाराला कळविले की, तुम्ही ऑक्ट्रॉय वसुली करायला तयार आहात का आणि ९ तारखेला ठेकेदाराने कळविले की, आम्ही ऑक्ट्रॉय वसुली करायला तयार आहोत. म्हणजे स्थायी समितीच्या दोन दिवसानंतर ही टिपणी आल्यानंतर पुन्हा स्थायी समितीसमोर हा विषय आला तेव्हा आता सन्मा. विरोधीपक्ष नेते चंद्रकांत वैती साहेबांनी जो उल्लेख केला मी तीन गोष्टी त्यामध्ये विचारले पहिली गोष्ट स्थायी समितीला निर्णय घेता येतो का? किंवा धोरणात्मक विषय म्हणून मा. महासभेत आला पाहिजे. दुसरा आपण १० टक्के वाढीव देतो ते १० टक्के वाढीव वाजवी आहे का? आणि तिसरे यापुढे ही मुदत म्हणजे जुलै ३१ संपण्याच्या पुढे वाढवणार? ह्या तीन गोष्टी विचारल्यानंतर प्रशासन स्वतः आयुक्त साहेब होते, त्यांनी सांगितले की, ही मुदतवाढ देणे आपल्याला भाग आहे. कारण महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रश्न आहे. आज साडे नउ कोटी रू. उत्पन्न वाढणार आहे आणि आपल्याकडे दुसरा पर्याय नाही. महापालिका वसुल करू शकत नाही. जो वाढीव दर आहे त्याचा आपण शासनाला प्रस्ताव पास केलेला आहे आणि ह्या सर्व गोष्टी बोलल्यानंतर व आज मा. महासभेमध्ये विषय आलेला आहे. धोरणात्मक म्हणून आयूक्तांनी माझी सुचना मान्य केली आणि आज हा विषय या महासभेमध्ये आलेला आहे. आता स्थायी समितीचे काही सदस्य गैरहजर आहेत. ते का गैरहजर आहेत हे आम्हालाही कळत नाही. त्याचे काय कारण आहे? पण मा. महासभेचा स्थायी समितीचा निर्णय एक मताने झाला होता. महापालिकेने मुदतवाढ द्यावी आणि त्या अनुषंगाने आज या प्रस्तावाला आम्ही येथे मान्यता देत आहोत.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रशासनाने पहिल्यांदा काही गोष्टी याठिकाणी एकदम स्पष्ट करायला हव्या आहेत. जकात बंद होणार आहे आज आणि उद्या असा फक्त एक महिन्याचा फरक राहिलेला आहे. उपकर लावण्या संदर्भात प्रशासनाने आतापर्यंत काय तयारी केली आहे याची माहिती द्या? समझा, आम्ही ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ दिली तर ३१ जुलैला पुन्हा रात्री १२.०० वा. येउन तुम्ही सांगणार की, आमचे उपकर लावण्यासंदर्भात काही तयारी नाही. आजच्या तारखेला प्रशासनाने या संदर्भात काय तयारी केली आहे? तुम्हाला जर माहिती आहे की, दोन वर्षांनी जकात कर जाणार आहे. सरकारने प्रत्यक्ष आदेश काढले त्यालाही पाच सहा महिने होउन गेले. तर याठिकाणी ज्यांच्याकडे विशिष्ट उपकराबाबत चार्ज दिलेला आहे त्यांनी स्पष्टपणे या सभागृहापुढे निवेदन करावे की, सेसच्या बाबतीत त्यांनी आतापर्यंत काय तयारी केली आहे आणि ३९ दिवसात ते काय तयारी करणार आहेत? याठिकाणी त्याची पहिल्यांदा माहिती द्यावी.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

महाराष्ट्र शासनाने राज्यातील "ड" वर्ग महापालिकेतील जकात कर बंद करून त्याऐवजी उपकर लागू करण्याचा राज्य शासकीय कॅबिनेट मंत्र्यांचे धोरण झालेले आहे आणि आपल्या महापालिकेमध्ये १ ऑगस्टपासुन उपकर लागू होणार आहे. त्या अनुषंगाने महापालिकेमध्ये जे कार्यान्वित नाके आहेत ते बंद होउन लेखाअधारित आणि मुल्याआधारीत उपकर वसुली प्रणाली सुरू होणार आहे. सदरची बाब राज्य शासनाच्या विक्रीकराच्या अंमलबजावणीशी निगडीत आहे. तत्वतः त्याचप्रमाणे आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने "ड" वर्ग महापालिकेतील पदाधिकारी मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता, मा. स्थायी समिती सभापती यांची कॉन्फरन्स घेउन याबाबतचा उद्देश मनोदय अवगत केलेला आहे. त्याचप्रमाणे "ड" वर्ग महापालिकेचे मा. आयुक्त महोदय यांची प्रधान सचिव स्तरावर त्यांच्या अध्यक्षतेखाली दोन वेळेस बैठका होउन याबाबतची कार्यप्रणाली निश्चित केलेली आहे. मा. प्रधान सचिव नगरविकास विभाग

यांच्या धोरणाप्रमाणे सन्मा. सदस्य पाटील साहेब यांनी मुद्दा मांडल्याप्रमाणे १ ऑगस्ट २००८ पासून या महापालिकेमध्ये उपकर लागू करण्यासाठी आवश्यक ती पुर्व तयारी सुरू झालेली आहे आणि या पुर्व तयारीचा मुख्य भाग म्हणजे आपल्याकडे ही कार्यप्रणाली जकातीपेक्षा वेगळी असल्यामुळे यासाठी स्कील मॅनपॉवर जे काय आपले कर्मचारी आहेत त्यांना तयारी करणे अपेक्षित आहे. त्यासाठी तज्ञ सल्ला तसेच हे काम राज्य शासनाच्या विक्री कराच्या प्रणालीप्रमाणे असल्यामुळे पहिल्या एक दोन वर्षासाठी किंबहूना तिन वर्षासाठी राज्य शासनाचे वर्ग-१ स्तरावराचे किंवा त्यापेक्षा श्रेष्ठ अधिकारी महापालिकेच्या कामासाठी डेप्युटेशन करून घेणे अपेक्षित आहे आणि महापालिकेतील जो स्टाफ आहे विशेषतः ग्रॅज्युएट स्तरावरचा जो स्टाफ आहे मग तो कोणत्याही विभागात कार्यन्वित असो त्यांना याबाबतचे सविस्तर प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे आणि प्रशिक्षणाचे कामकाज हे चालू झालेले आहे. आतापर्यंत आपले तीन बॅचेस पुर्ण झालेले आहेत आणि मास्टर ट्रेनर ह्यांनी तीन बॅचेसमध्ये प्रशिक्षण घेतलेले आहे त्यांनी महापालिकेतील कर्मचाऱ्यांना सविस्तर प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने नवि मुंबई महापालिकेमध्ये जो उपकर लागू आहे त्यातील कार्यान्वित अधिकाऱ्यांचा एक गट तयार करून नगरपालिका निहाय ते प्रशिक्षण आयोजित करणार आहेत आणि ते प्रशिक्षण थोड्याच दिवसात आपल्याकडे सुद्धा सुरू होणार आहे. या सोबतच आपल्याला उपकर कार्यालय तयार करणे अपेक्षित आहे. जो सध्या आपल्या नाका नं. ७ आहे माझा मनोदय आहे, यासाठी विशेष मा. महासभेमध्ये असाच एक विषय आम्ही उपकरासाठी आपल्यासमोर आणणार आहोत. त्यामध्ये राज्य शासनाची जाहिर सुचना झाल्यानंतर उपकराचे दर काय असावेत? उपकर लागू करण्यासाठी कार्यालय कुठे असावे? त्या कार्यालयाची रचना कशी असावी? या अनुषंगाने थोड्याच दिवसात आपल्या समोर हा सविस्तर विषय अभ्यासपूर्ण आपल्यासमोर सादर करणार आहोत. जो नाका क्र. ७ आहे त्याच ठिकाणी या ऑफिसची निर्मिती करावी लागणार आहे. त्याठिकाणी हे लेखेआधारीत प्रणाली असल्यामुळे आपल्याला हे काम कॉम्प्युटराईज करावे लागणार आहे. नवी मुंबई महापालिकेचे कामकाज हे संगणकाच्या माध्यमातून होत आहे. त्याचा खर्च सुद्धा फार जास्त नाही. नवि मुंबईची जी संगणक प्रणाली आहे. राज्य शासन आपल्याला डायरेक्शन देणार आहे. आपण तेच ॲडॉप करणार आहोत. यामध्ये विशेषतः जी काही स्टेशनरी लागते त्या स्टेशनरीची आम्ही सर्व सुची प्राप्त करून घेतलेल्या आहेत. वेगवेगळे लेजर, फॉर्म्स, पावत्या त्यांचे मिनटाईममध्ये आपल्याला मॅटर प्रिंटींग करून घेणे अपेक्षित आहे. मुख्यत्वे ऑफिस तयार करणे. त्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांचे अपग्रेडेशन करणे. कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे. जकातमध्ये कर्मचाऱ्यांचे नामांकन होते. ते नामांकन आपल्या माध्यमातून मंजुर करून घेणे. म्हणजे उपकर अधिकारी, उपकर इन्फोर्समेंट, ऑफीसर, लिपिक, महासमावेक हे जे पदांचे नामांकन आहे ते आपल्या मा. महासभेच्या मान्यतेने करून घेणे. ह्यासाठी राज्य शासनाचे जे अधिकार आहेत. म्हणजे उपकरामध्ये मा. आयुक्तांना कोर्टाचे अधिकार दिलेले आहेत त्यासाठी राज्य शासनाचा सील यासाठी वापरला जाणार आहे. त्या सीलची आपल्याला तयारी करावी लागणार आहे. उपकरासाठी महापालिकेचा जो सील आहे तो सुद्धा आपल्याला याठिकाणी वापरावा लागणार आहे. म्हणजे एकंदरीत कर्मचाऱ्यांची ट्रेनिंग, कर्मचाऱ्यांना हे कामकाज करण्यासाठी अपेक्षित स्टेशनरी, ऑफिस आणि ज्यांच्याकडून आपल्याला उपकर वसुली करावयाचा आहे त्या व्यापाऱ्यांना ह्याबद्दलची सविस्तर माहिती तर व्यापाऱ्यांच्या बैठका आपण घेणार आहोत आणि याच अनुषंगाने शहरामध्ये जे काही व्यवसायधारक आहेत त्यांचा डिटेल सर्व्हे मी आपल्याला सांगू इच्छितो की मागच्या महिन्यामध्ये आम्ही हाउस टु हाउस सर्व्हे करून या व्यवसायधारकांची यादी आपल्याकडे तयार केलेली आहे. त्यामुळे आपल्याला एकदा शासनाचे नोटीफिकेशन झाले तर याची पुर्व तयारी आपल्या मान्यतेने करावयाची आहे. जे काय आम्ही करत आहोत ते आपल्या निर्दशनास आणून आपल्या सुचना यामध्ये अंतर्भुत करून पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

**चंद्रकांत वैती :-**

जकात दरवाढीला मुदतवाढ द्यायची आहे. त्याला कोणाचा विरोध नसावा. या शहराच्या हितासाठी, विकासासाठी येणारा जो निधी आहे तो त्या माध्यमातून येणार आहे. सभागृहात सारासार चर्चा चालू आहे. सदस्य आपली मत व्यक्त करतात आणि त्याच्यामध्ये व्यापाऱ्यांना आणि जे सामान आणणार आहेत त्यांना दिलासा मिळावा म्हणून जो नविन दर आहे त्याच्यापेक्षा प्रचलित दराने लागावी या मताचे आम्ही आहोत. जर आपल्याला असे वाटत असेल की, नाही, नविनच दर लागला पाहिजे तर मग लगेच ठरावाचे वाचन करायला सांगणे हे योग्य आहे.

**मा. महापौर :-**

आपल्या ज्या सुचना असतील त्या मांडा. सचिव साहेब आपण ठरावाचे वाचन करा.

**प्रफुल्ल पाटील :-**

असे करता येत नाही. आपली चर्चा संपलेली नाही.

**अनिल सावंत :-**

चर्चा होउ द्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण नियम वाचा.

**मा. महापौर :-**

आपली जी सुचना असेल ती आपण मांडा.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, पहिल्यांदा चर्चा होउ द्या. चर्चा झाल्यानंतर ठरावाचे वाचन होणार. मग मा. महासभेमध्ये विषय कसा काय आणला? डायरेक्ट पास करायचा होता.

**मा. महापौर :-**

आपली जी सुचना असेल ती आपण मांडा.

**अनिल सावंत :-**

सुचना मांडतोय. मग आपण ठराव कसे काय वाचन करायला सांगता. मी विनंतीपुर्वक तुमच्याकडे परवानगी मागतोय. चर्चा होउ दे.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रशासनाकडून प्रॅक्टीकली कुठल्याही प्रकारचा सेस घेण्या संदर्भात कुठलीही माहिती नाही. नुसते आता सांगितले की, वरिष्ठांनी काय डायरेक्शन दिले आहेत, काय छपाई केलेले आहे हे सगळ झालेले आहे. आता मी जर तुम्हाला विचारले की, स्टील उत्पादकांची किती संख्या आहे? हे कोणी येथे सांगेल का? स्टील व्यापाऱ्यांचा व्यवहार किती करोडचा आहे? १९८५ साली नगरपालिका स्थापन झाली. दोन वर्षांनी लगेच जकात आली. १९८७ पासुन ते २००८ पर्यंत एवढ्या वर्षामध्ये प्रशासनाने कधी हा अभ्यास केला आहे का? की, इतके कारखानदार आहेत. स्टील मार्केटवाले इतके आहेत. त्यांचे इतके ट्रान्झॅक्शन आहे. सांगावे त्यांनी तुम्ही ३१ तारखेला जागे होणार. नंतर मा. महासभेपुढे विषय आणणार की, अजुन सेसची कार्यप्रणाली बाकी आहे जकातवाढीला मुदत द्या. बाहेर व्यापारी बसलेले आहेत. मा. महापौर साहेब, आपण पण व्यापारी आहात. विसरला वाटते, आता महापौर झाल्यानंतर. बाहेर काय परिस्थिती आहे ते बघा. आत्ताच लोक त्याठिकाणी उभे आहेत. आम्हाला वाईटपण घ्यायचे नाही. तुम्हाला दरवाढ द्यायची.......

**मा. महापौर :-**

कालपर्यंत तुम्हाला व्यापाऱ्यांकडून त्रास होता आज तुम्ही बोलता की, व्यापारी आहे. हे जे स्थायी कडून आलेले आहे ते आपल्याकडूनच पाठवले गेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

स्थायी समितीने पाठविले म्हणून स्थायी समितीचा सार्वभौम अधिकार म्हणून तुम्ही पास करा.

**अनिल सावंत :-**

मा. महासभेसमोर विषय कशाला आणला?

**मा. महापौर :-**

आपणच रेफर केले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण म्हणजे प्रफुल्ल पाटील नव्हे.

**मा. महापौर :-**

आपण म्हणजे कॉंग्रेस पक्ष.

**प्रफुल्ल पाटील :-**

कॉंग्रेस पार्टीने स्थायी समितीला असे सांगितले नाही की, हे सुचवा. स्थायी समिती सभापतीचा जो काही सार्वभौम अधिकार आहे, त्यांनी तसा विषय आणला. शेवटी, परिस्थिती अशी आहे की, तुम्ही आता शेवटच्या तारखेपर्यंत डिसीझन घेउ शकला नाहीत. म्हणून तुम्हाला मुदतवाढ द्यायला लागते. तुमची सेसची जर तयारी असती तर मुदतवाढ देण्याचा प्रश्न कुठे येत होता? मुदतवाढ दिल्यानंतर बाहेर वातावरण असे आहे की, अव्वाच्या सव्वा आम्हाला एकतर सगळे ठेकेदार आतापर्यंत व्यापाऱ्यांना लुटत आलेले आहेत. तिथे जोर जबरदस्ती, मुद्दामून गाडी गेटवरून पुढे सोडतात हे अडवत नाही आणि पुढे गेल्यानंतर सांगतात की, १० टाईम ऑक्ट्रॉय भरा. मला सांगा की, तुमच्या कमिटीमध्ये किंवा प्रशासनाने अशा किती केसेस व्यापाऱ्यांच्या काढल्या. तक्रारी किती सोडविल्या आणि ठेकेदाराला किती फाईन केला? ठेकेदार १० पट वसूल करतो. फाईन वसुली करतो आणि त्याच्या तिजोरीत भरतो. तो तुमच्याकडे पैसा येत पण नाही. जो प्रामाणिकपणे पैसे भरायला तयार आहे त्याला गेटवर थांबवत नाही. गाडी पुढे जावू दे. गाडी जरा पुढे गेली की गाडी पुढे का गेली? आता बाजूला लावून ठेव. २४-२४ तास, ४८-४८ तास वाहन थांबविलेले आहेत. आता उरलेल्या ३९ दिवसाकरिता आम्हांला असा कुठल्याही प्रकारचा अन्याय ठेकेदारांकडून व्यापाऱ्यांवर करायचा नाही. एवढे करत असताना ही मुदत ३१ पर्यंत राहिल याची संपूर्ण खात्री प्रशासनाने देण्यासंदर्भात काहीच कार्यवाही केलेली नाही. आपण नवी मुंबईची तुलना आमच्याबरोबर करता. नवी मुंबईला सगळ्या इलेक्ट्रॉनिक्स कंपन्या आहेत आणि मोठया कंपन्या आहेत कुठलाही छोटा व्यापार करत नाही. १००टक्के बिलिंग आहे. भाईंदर मधल्या एकातरी प्रशासकीय अधिकाऱ्याने ठामपणे सांगावे की भाईंदरमध्ये जेवढे व्यापारी व्यापार करतात. त्यांचे १००टक्के बिलिंग असते की नसते? तुम्ही मला नुसते स्टीलचे सांगा. स्टीलच्या गाड्या येतात पाट्याच्या

गाड्या येतात त्याला कुठलेही बिलिंग नसते आणि ते तसेच असेल तर इंट्र्या न करता आतमध्ये जातात आणि गेल्यानंतर तुम्ही सेस काय घेणार? त्यांच्याकडे जेव्हा बिलिंगची पद्धत नाही. चलन नाही. रेकॉर्ड नाही. एवढ्या एवढ्याशा चिठ्या फाडतात. चिठ्यानंतर व्यापार चालतो. तुम्हांला जर सेस लावायचा होता त्याच्यात साधा हिशोब आहे. ठेकेदाराने जेवढी वसूली केली. त्याच्या सगळ्या पावत्या त्या पावत्यांवर कारखानदार कोण आहे? व्यापारी कोण आहे? तो कुठल्या प्रकारचा माल आणतो? त्याचे वजन किती आहे? त्याचे वर्णन काय आहे याची माहिती तुम्ही का जमा केली नाही? वर्षभरात जेव्हा ठेकेदाराने वसूली केल्या किंवा त्यांनी पावत्या दिल्या की नाही? महानगरपालिकेची पावती दिल्याशिवाय तर तो सोडत नाही. मग महानगरपालिकेची पावती डाटा बेसकरून कम्प्यूटरला इंट्र्या का नाही केल्या? म्हणजे तुम्हांला एवढे कळाले असते की एका वर्षामध्ये एका आयातीकाने एका व्यापाराने एका वर्षामध्ये एवढा माल आणला आणि त्याने तेवढी जकात भरली. म्हणजे त्याचे करोडो रुपयांचे बिलिंग झाले ह्याचा आपल्याकडे डाटा बेस असता. साहेब तुम्ही जेव्हा एखाद्याला असेसमेंट भरायला सांगणार तेव्हा तुम्ही त्याच्याकडे रेकॉर्ड काय मागणार? जर त्याने काही रेकॉर्ड दिला तर तो तुम्हांला खरा मानावा लागेल. तुम्ही व्हेरीफाय काय करणार? ॲट लिस्ट हे नाहीतर ३९ दिवसात तेवढे तरी तुम्ही करा. जे जे व्यापारी येतात त्यांची तुमच्याकडे ताबडतोब इंट्री केली पाहिजे आणि आम्हांला जकातीच्या ठेक्याला मुदतवाढ देताना कुठल्याही प्रकारची दरवाढ करता कामा नये. त्याच्यामुळे व्यापाऱ्यांवर आता तुम्ही दरवाढ केली की तिथे डबल वसूली चालू होईल. म्हणून याठिकाणी मी सुचना माडत आहे की जकात वसूली ठेकेदार मे. कोणार्क इनफ्रास्ट्रक्चर लि. यांना दि. ३१/०७/०८ पर्यंत जकात वसूली ठेक्याची मुदतवाढ देताना कोणतेही जकात दरवाढ न देता मागील दराप्रमाणेच ठेकेदाराने जकात वसूली करावी. मुदतवाढीच्या काळामध्ये ठेकेदाराने आयातीकांवर कोणतीही जकात दरवाढ किंवा गैरवसूली केल्यास या सर्व प्रकरणांच्याबाबत एक समिती नेमण्यात यावी. या समितीमध्ये सर्व पक्षांचा एक सदस्य असावा आणि उपायुक्तांच्या अध्यक्षतेखाली ही समिती गठीत करण्यांत यावी. ३९ दिवसामध्ये प्रशासनाने तीन ड्युट्यांना क्लास-२ ऑफीसरच्या अधिकाऱ्यांची नेमणुक करावी. कारण तिथे जेव्हा व्यापारी जातो, आपला अधिकारी नसतो. त्याला कुठेही न्याय मागायला मिळत नाही. तो दुसऱ्या दिवशी उपायुक्तांकडे येतो तेव्हा तो ठेकेदार हजर नसतो आणि त्याला न्याय मिळतो तो चार दिवसांनी तोपर्यंत त्याची चार दिवस गाडी उभी राहते. ३९ दिवसामध्ये ठेकेदार तुम्हांला जेवढे पिळायचे आहे तेवढे पिळणार आणि सगळा दुष्पपरिणाम आमच्या महानगरपालिकेच्या गुडविलवर होणार आहे म्हणून याठिकाणी मी सुचना मांडत आहे.

**जुबैर इनामदार :-**

या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब आपण जी सुचना केली त्यात शंका नाही. ती व्यापाऱ्यांच्या हिताची आहे. आपल्याकडे आयुक्तांबरोबर बसून त्यांनी जे निगोसिएशन केले होते. ते नविन उपकर आणि नविन रेटप्रमाणे केले होते त्याची जी काय रक्कम होती ती त्यांनी ॲक्सेप्ट केलेली आहे. तर ते त्यांनी मान्य केले. त्याप्रमाणे स्थायी समितीने ते मंजूर करुन येथे पाठवलेले आहे. आपण त्यांना सांगितले की, जुन्या रेटप्रमाणे ऑक्ट्राय आकारावे पण तो त्या रक्कमामध्ये ॲग्जेस्ट करेल का किंवा त्याला तेवढे प्रपोशनेट कमी करुन द्यायचे असा मुद्दा आहे आणि आज शेवटचा दिवस आहे.

**चंद्रकांत वैती :-**

रिटायर्ड होणाऱ्या अधिकाऱ्याने काय करता येते ते शहराला दाखवलेले आहे जाता जाता ठेकेदाराने तसे काय केले तर आपण काय करणार? व्यापाऱ्यांएवढा हुशार माणूस दुसरा कोणी नसतो. येणाऱ्या ३९ दिवसामध्ये शेवटचे १५ दिवस व्यापारी आवश्यक लागेल तेवढच सामान आणतील किंवा जकात नाक्याची मुदत संपण्याची वाट बघतील मग व्यापाऱ्यांनी ठरविले की आम्ही उद्यापासून कामाला सुरुवात करतो. जोरदार वसूलीला आणि आपण जर जुन्या दराने ठेवले जो ७४ करोड रुपयाचा आपण ठेका मंजूर केला होता त्याच्याने वसूली ठेवली म्हणजे आजच्या भानगडी बंद आहेत. कुठच्याही प्रकारच्या लोकांच्या तक्रारी आपल्याकडे येत नाही. आपली एखाद दुसरी तक्रार तर ती नाक्यावरून गाडीपुढे घेउन गेलास, व्यापारी जो जकात ठेकेदार, जकात वसूल करताना काय काय हातखंडे वापरतो ते सगळ्यांना माहित आहे तर तो उद्यापासून सुरूवात करणार नव्या दराने आणि व्यापारी किंवा जकात भरणारा आयातक आणि जकात ठेकेदार यांच्यामध्ये अनाठाई वाढ होत जातील महापालिकेला इनव्हॉल व्हायला लागेल. त्याच्यामध्ये जर जुन्या दराने वसूली केली तर त्याच्या कुठच्या भानगडी होणार नाही आणि मागचा १५ दिवसाचा व्यापार देखिल व्यापारी बंद करणार नाही व्यापारी शेवटपर्यंत रेग्यूलर कोर्समध्ये आहे म्हणून करतील कारण व्यापाऱ्यांना माहिती आहे की गेल्या वर्षभरात आपण या आयटमवर एवढी जकात भरलेली आहे तर तेवढीच भरावी लागेल. पण उद्या त्याच्यापेक्षा जास्त पटीने जकात भरावी लागेल म्हणून सन्मा. नगरसेवक प्रफुल्ल पाटील साहेबांनी जी उपसुचना केलेली आहे त्याचे मी समर्थन करतोय आणि ती उपसुचना आपण स्विकारावी अशी आपल्याला विनंती करतो.

**मा. महापौर :-**

सभागृहाला माझी विनंती अशी आहे की सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी सुचना मांडली. व्यापाऱ्यांच्या हिताची आहे आणि सर्वांचे मत व्यापाऱ्यांच्या हिताबरोबर आहे. माझी त्याच्यामध्ये एवढी सुचना आहे की त्यानी नविन रेटप्रमाणे आपल्याला ९२ करोडप्रमाणे त्याप्रमाणे आपल्याला ॲग्री केलेले आहे. आता समजा आपण त्यांना बंधन टाकले की जुन्या रेटप्रमाणे करावे पण मागचे ७४ करोड प्लस १०टक्के वाढीव तर त्याप्रमाणे करायचे का?

**प्रफुल्ल पाटील :-**

आम्ही प्रचलित दर म्हटले आहे. आज जो दर आहे त्याच्यापेक्षा जास्त वाढीव दर नाही.

**मा. महापौर :-**

त्यांनी आपल्याला ९२ करोडप्रमाणे ॲक्सेप्ट केले आहे ते नविन रेटप्रमाणे केले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

नविन रेट कोणी ठरविला?

**मा. महापौर :-**

मा. महासभेने बजेटमध्ये मंजूरी दिली होती.

**प्रफुल्ल पाटील :-**

नविन रेटप्रमाणे आज वसूली चालू आहे का?

**मा. महापौर :-**

नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग आहे त्या रेटप्रमाणेच घ्या.

**मा. महापौर :-**

त्यांच्याबरोबर आयुक्त साहेबांचे निगोसिएशन झाले होते ते नविन रेटप्रमाणे झाले होते. साहेब आपण क्लिअर करा.

**चंद्रकांत वैती :-**

कमिशनर साहेब आपण उत्तर द्यायला उठलेला आहात तर आपण संपूर्ण निवेदन करावे. आपल्याकडे उपकराबद्दलची जी सेस बद्दलची माहिती आहे आणि हा जकात ठेका नक्की २१ तारखेला संपतो किंवा त्याच्यापासून किती नुकसान होणार आहे? किती फायदा होणार आहे याचा उहापोह आपल्या निवेदनात व्हावा.

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब माझा ही एक मुद्दा आहे त्याच्यावर आपले एकदमच निवेदन करा. श्री. खतगांवकर साहेब ठेकेदाराला ठेका देतेवेळी जी दंडात्मक रक्कम आहे त्याच्याबद्दल काय प्रोव्हीजन आहे? ती महानगरपालिकेने जमा करायची आहे की, ठेकेदाराला जाणार आहे? त्याने आजपर्यंत ही दंडात्मक रक्कम किती वर्ष गेली महानगरपालिकेत येते? आयुक्त साहेब ऑक्ट्राय भरण्यावर लोकाचां रोष नाही. १९ मार्च ला मा. महासभेत ठराव झाला आणि त्याचवेळी स्टेंट गव्हमेंटचे बजेट सेक्शन चालू होते आणि त्यावेळी कळले की ऑक्ट्रॉय निघून गेला. "ड'' वर्गा तील महानगरपालिकांना ऑक्ट्रॉय निघून गेला. त्यामुळे लोकांच्या ह्या अपेक्षा होत्या की १ एप्रिलपासून या शहरामधून ऑक्ट्रॉय निघून जाईल. अजुनपर्यंत आपण कुठचीही तयारी केलेली नाही. मा. सभापतींनी जो ठराव मांडला त्याच्यामध्ये सुद्धा असे म्हटलेले आहे की १ ऑगस्टपासून सेस लागण्याची शक्यता आहे. सेस चालू होणार की नाही हे कन्फम नाही अशी उदाहरणे आहेत ज्यापद्धतीने तिथे ऑक्ट्रॉय वसूल केला जातो त्या पद्धतीला लोकांचा विरोध आहे अशी काही उदाहरणे मी तुमच्यासमोर आणू इच्छितो फक्त एक उदाहरण सांगतो. बेस्टच्या बसमध्ये एक लेडी चढली. काशिमिरा नाक्यावर ऑक्ट्रायच्या माणूस त्याच्याजवळ कुठचा बॅच नाही कुठचा ड्रेस नाही. तो माणूस चढला आणि त्या लेडीजची पर्स चेक केली ती लेडी डॅशींग होती म्हणून त्याच्या कानाखाली मारुन त्याला खाली उतरविले अशाप्रकारची उदाहरणे आहेत. ३९ दिवसांनी त्यांचा भुर्दंड लोकांना परत ऑक्ट्रॉय भरायला लावण्याचा त्याच्यात तुम्ही जर दरवाढ केली तर लोकांमध्ये प्रचंड असंतोष होईल. मागच्या वेळी मी सुचना मांडली होती. १९ मार्चला ज्यावेळी डिसक्शन झाले की, या मिरा भाईंदर शहराची लोकवस्ती झपाट्याने वाढत आहे. त्याचप्रमाणे कर्जेची पॉवर सेवा लोकांची वाढलेली आहे आणि त्या हिशोबाने विदाउट इनक्रिजींग एक्झीस्टींग रेट तुम्ही ऑक्ट्रॉयचा जो ठेका दिलेला आहे त्याची अमाउंट वाढवा असे त्यावेळी मी मा. महासभेमध्ये सुचना मांडली होती. तर या सर्व गोष्टींचा विचार करुन ३९ दिवसासाठी आणि तेवढेच लिमिटेड ठेवा. १ ऑगस्टपासून सेस चालू होईल ह्याची पूर्ण तयारी करा. या सर्व गोष्टींचा तुम्ही आज जो निर्णय घ्याल त्याच्यामध्ये करावा अशी विनंती करतो.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सभागृहाला सांगू इच्छितो की १८ मार्चला ज्यावेळेस आपल्याकडे मा. महासभा सुरु होती. त्याचदिवशी मा. वित्तमंत्री महोदयांनी विधीमंडळात असे जाहिर केले की पुढील आर्थिक वर्षापासून जकात रद्द करुन त्याठिकाणी उपकर लावण्यात येईल. तसे जाहिर निवेदन त्यांनी केल्यानंतर सुद्धा त्यानंतर शासनाचा

जो निर्णय नावाची प्रक्रिया आहे कॅबिनेटसमोर विषय जाउन त्याप्रमाणे आपल्याला त्यांनी लेखी कळविणे जे अपेक्षित आहे. त्याबाबत आम्ही वेळोवेळी शासनाच्या संपर्कात आहोत आपण लेखी पत्र देखिल त्यांना दिलेले आहे. त्याबाबत शासनाने आमची २३ तारखेला बैठक देखिल घेतलेली आहे तथापि तो अद्यापही लेखी आदेश आपल्याजवळ प्राप्त नाही. ही वस्तुस्थिती आहे म्हणून आपण शक्यता आहे असा शब्द वापरला आहे. याच्यामध्ये तद्नंतर सर्व संबंधित आयुक्तांची बैठक प्रधान सचिवांनी घेतल्यानंतर मा. राज्यमंत्री महोदयांनी श्री. खतगांवकर साहेबांनी सांगितल्याप्रमाणे सर्व महानगरपालिकेचे मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. विरोधी पक्षनेते, मा. सभागृह नेते मा. स्थायी समिती अध्यक्ष यांची सुद्धा एक कॉन्फरन्स घेतली आणि तिथे सुद्धा महानगरपालिकेचे लोकप्रतिनिधी यांचे विचार जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे त्यावेळेस ॲज युझवल वेळ फार कमी असल्यामुळे १ एप्रिलपासून तर ते लागू करणे शक्य नव्हते. त्यामुळे मग शासनाने सुरुवातीला ज्या महानगरपालिकांचे ठेके जून महिन्यापर्यंत संपत आहे. त्यांना १ ऑगस्ट पासून मुदत दिली. जेणेकरुन एक महिन्यात ती पुढची कार्यवाही सेस लावण्याचे करु शकतील. या महानगरपालिकांची मुदत पुढे ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये संपते. त्यांना डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. ज्या महानगरपालिकचे ऑलरेडी ठेके जानेवारी, फेब्रुवारी, मार्च २००९ पर्यंत आहेत त्यांना १ एप्रिल २००९ अशी त्यांनी मुदतवाढ दिलेली आहे. थोडक्यात आपण सर्व सन्मा. सदस्यांनी व्यक्त केल्याप्रमाणे शासनाने यावर कॅबिनेट डिसीजन घेतलेला आहे. ही वस्तुस्थिती आहे. परंतु, कॅबिनेट डिसीजन हा सरसकट सारखा नसुन, महानगरपालिकांच्या ठेकानिहाय त्यांनी त्यांचे स्लॅब केलेले आहेत. असे केल्यानंतर सुद्धा आपल्या सन्मा. लोकप्रतिनिधींनी मा. राज्यमंत्री महोदयांसमोर आपली गाऱ्हाणे मांडली. त्यामध्ये वेळ फार कमी आहे. आत्ताच आपल्याला श्री. खतगांवकर साहेबांनी डीटेल सांगितलेले आहे की, आपल्याला कॉम्प्युटरायझेशन करावे लागेल. आपल्याला ट्रेनिंग घ्यावे लागेल. आपल्याला संबंधित व्यापाऱ्यांची नोंदणी करायला लागेल. व्यापाऱ्यांची नोंदणीच फक्त महत्वाची नाहीतर सन्मा. नगरसेवक पाटील साहेबांनी आता सांगितल्याप्रमाणे व्यापाऱ्यांची नोंदणी हा एक भाग झाला आणि व्यापारी प्रत्यक्षात किती कारभार करतो व किती दाखवतो? हा दुसरा भाग झाला आपल्याला माहिती आहे की, व्यापारी टॅक्सचे थोडा बहूत बचत होईल म्हणून थोडा बहूत कमी दाखवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनावर फार मोठी जिम्मेदारी आहे आणि त्याची जाणीव संबंधित लोकप्रतिनिधींना असल्यामुळे लोकप्रतिनिधींनी प्रशासनाची अडचण लक्षात घेउन राज्य शासनाला अशी विनंती केली होती की, आम्हाला थोडी मुदत जास्त मिळावी आम्हाला भरपुर टाईम मिळावा. जेणेकरून आम्ही त्याची पार्श्वभुमि तयार करू शकू. आम्हाला त्याची पुर्ण तयारी करता येईल आणि एवढी पूर्ण तयारी करून सुद्धा मागच्या वर्षी जेवढा आपल्याला ऑक्ट्रॉय भेटला. तेवढाच सेस मिळेल ह्याची काही गॅरेंटी नाही. ह्याचा विचार करून पहिल्यावर्षी १५ टक्के जर तुम्ही १०० टक्के वसुली केली तर तुम्हाला एक पैसा मिळणार नाही. पण तुम्ही ८५ टक्के वसुल केले तर १५ टक्के अनुदान शासन देणार आहे. परंतु, आपण ८५ टक्क्यापेक्षा कमी वसुली केली ७५ टक्के केली किंवा ७० टक्के झाली तर उरलेला १० टक्के १५ टक्के आपल्याला नेट लॉस होणार आहे. ही बाब मी आत्ताच सभागृहाच्या निर्दशनास आणून देउ इच्छितो. पहिल्यावर्षी १५ टक्के वायबलेटी गॅप झाला असे म्हणता येईल तो अधिव्युह केलेला आहे. दुसऱ्या वर्षी १० टक्के तिसऱ्या वर्षी ५ टक्के आणि चौथ्या वर्षापासुन तुम्हाला त्यांनी सेस कम्प्लीट. तुमचे तुम्ही बघा असे सांगितलेले आहे यामध्ये मी सभागृहाला परत सांगू इच्छितो की, श्री. खतगांवकर साहेबांनी सांगितल्याप्रमाणे अशाप्रकारे सेस लावायचा असेल तर एक विशेष मा. महासभा परत बोलवावी लागते. त्या विशेष सभेसमोर सेस हा एकच विषय राहिल. त्यादिवशी आपण सेसबद्दल सांगोपांग चर्चा करू आणि सेसबद्दल चर्चा झाल्यानंतर आपल्या सर्व सुचनांचा विचार करून मला जाणीव आहे की, आपण सर्वजण महानगरपालिकेच्या फायद्यासाठी आणि त्याच बरोबर कुणाचेही नुकसान होणार नाही. कोणावर ही जबरदस्ती होणार नाही याचा आपण सर्वण मध्य साधण्याचा सतत प्रयत्न करत असतो. त्याप्रमाणे आपण नंतर सविस्तर त्याबद्दल बोलून तो सेस पुढे कसा घेउन जाता येईल याची आपल्याला चर्चा करता येईल. सेसमध्ये नंतर व्यापाऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्याचा प्रयत्न करून त्यांचे रजिस्ट्रेशन फास्ट करून त्यांच्यासाठी आपली लोक त्यांच्या दारोदार, त्यांच्या घरी जातील, दुकानात जातील, त्यांच्या आस्थापनेवर जातील. उद्देश असा आहे की, तुम्ही तुमच्या आस्थापनेप्रमाणे रजिस्टर करा. तुम्ही जो काय व्यापार करता तो सेल्सटॅक्स जेवढा भरता त्याप्रमाणे आमच्याकडे तुम्ही सेस भरा. त्याच्यामध्ये कोणाला त्रास देण्याचा आमचा उद्देश राहणार नाही. मला फक्त सभागृहाला हेच सांगायचे आहे की हे सर्व जरी करायचे असले तरी परटीक्युलरली श्री. पाटील साहेबांना माझी विनंती आहे की, शासनाकडून जोपर्यंत आपल्या सभागृहाचे किंवा महानगरपालिकेचा निर्णय नाही. महानगरपालिकेला जर निर्णय करायचा असता तर प्रथम आम्ही आपल्याकडेच आलो असतो की, सेस लावायचे का हे करायचे? परंतु, वरून निर्णय येत आहे वरून निर्णय आल्यानंतर आपल्याला त्याची अंमलबजावणी कितपर्यंत आणि कशी करता येईल? एवढेच आपल्या हातात आहे त्या दृष्टीने आपण पुढे जावू त्यामुळे सेस लावण्यासाठी ज्यावेळेस शासन आपल्याला नोटीफिकेशन काढून कळवेल त्यानंतर आम्ही लगेच आपली विशेष सभा लावून त्याबद्दल सविस्तर निवेदन करू आता माझी थोडक्यात विनंती हिच आहे की, आता आपण जो ९२ कोटी उत्पन्न गृहीत धरलेला आहे त्याचा बेस असा आहे की, स्थायी समिती समोर आणि जनरल बॉडीसमोर मार्चपुर्वी आपण काही रेट वाढविले ते रेट वाढ गृहीत धरून

आपण १८ तारखेला ज्यावेळेस बजेटमध्ये बोलत होतो त्यावेळेस मी पण त्याच दिवशी आलो होतो. त्यादिवशी आपण असा विचार केला की, मागच्या वर्षी समझा ७३ कोटी रू. होते. त्याच्यामध्ये १० टक्के वाढ आपण नॅचरल धरतो. तर ७३ मध्ये परत ७.३ कोटी ॲड करून जे काय ८० कोटी होईल ते होईल. त्या ८० कोटीच्या हिशोबाने आपण पुढे जायला पाहिजे होते. जर सेस लागला नसता तर टेंडरमध्ये आपण ती अपसेट प्राईज धरली असती. तथापि, त्यावेळेस मागच्या दोन स्थायी समितीमध्ये झालेला निर्णय आणि सर्वसाधारण सभेमध्ये झालेला निर्णय ह्या निर्णयांचा विचार करून काही आयटममध्ये आपण वाढ प्रस्तावित केली. ती वाढ ही आपण गृहीत धरली. त्या वाढीपोटी येणारे जे उत्पन्न आहे ते प्रशासनाने समजा ९ कोटी रू. असे अंदाजे सांगितले होते. त्यावर सारासार विचार करून जनरल बॉडीने बजेटमध्ये ९२ कोटी हा अंतिम आकडा घेतला. त्यामुळे आता ही आपण निर्णय घेउ शकता. परंतु ९२ कोटीच्या हिशोबाने आपण त्यांना पत्र दिले आणि त्यांनी आपल्याला वाढीव तेवढा हफ्ता देण्याचे मान्य केलेले आहे. पण जर आज सभागृहाची अशी भावना असेल तर ठिक आहे. जरी स्थायी समितीने ह्या पुर्वी निर्णय केला असला जरी मा. महासभेने ह्यापुर्वी दर वाढविण्याचा निर्णय घेतला असला जरी वाढीव दराच्या ऐवजी आपण पुर्वीचे दर लावू तर मला एवढेच सांगायचे आहे की आता जो हफ्ता आपण गोषवाऱ्यात लिहिलेला आहे तो ९२ कोटी भागीले महिने भागिले हफ्ते भागीले दिवस असा करून आलेला आहे. त्याच्याऐवजी ही जी वाढीव रक्कम आहे ती मायनस करून जी आपली मागच्या वर्षीची एकंदर रक्कम वसुल केलेली आहे त्याच्यावर जो १० टक्के वाढ आहे त्या १० टक्के वाढीला भागीले महिने भागीले हफ्ते करून जी रक्कम होईल ती करेल असा धोरणात्मक निर्णय घेतला तर आमची काही हरकत नाही. फक्त त्याच्यामध्ये जवळपास १ कोटी रू. ह्या ३९ दिवसात महापालिकेला कमी मिळतील हे मला आपल्या निदर्शनास आणून द्यायचे आहे.

**अनिल सावंत :-**

दंडात्मक रक्कम आणि करोडो रूपयाचे जे सामान जप्त केलेले आहे ऑक्ट्राय एजंटने, व्यापाऱ्यांचे तो विषय महासभेमध्ये का घेत नाही?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य अनिल सावंतजी मी खुलासा करतो, मा. जयंत पाटील यांचा ठराव आलेला आहे त्याच्यामध्ये सन्मा. प्रफुल्ल पाटील यांनी सुचना मांडलेली आहे. ३१ जुलैपर्यंत आपल्याला अजुन ऑक्ट्रॉय वसुल करायचा आहे. जनरल बॉडीमध्ये आणि स्थायी समितीमध्ये ठरले होते की, नविन दराप्रमाणे आपण जकात वसुली उपकर वसुल करायचा आहे. जकात सुद्धा त्याच दराने वसुली करायची होती. पण नविन नोटीफिकेशन आले नाही. ३१ जुलैपासुन आपण उपकर लावणार आहोत. पण त्यात पहिले कमीत कमी या महिन्याची तरी राहत मिळावी म्हणून त्यांना जुन्या रेटप्रमाणे जे अगोदरचे प्रचलित रेट आहे त्याप्रमाणे ऑक्ट्रॉय वसुल करण्यात यावे आणि ठेकेदाराला सुद्धा जे मागच्या दराने टेंडर अमाउंट आहे त्याच्यामध्ये १० टक्के वाढ करून त्याप्रमाणे त्याच्याकडून हफ्ता स्विकारण्यात यावा. तर ही उपसुचना मी या ठरावामध्ये स्विकारत आहे. आणि सचिव साहेब ठराव वाचून कायम करण्यात यावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

एक महत्वाची बाब आपल्याला सांगतो, प्रशासनाने असे समजु नये की, शासनाने अजून अंतिम नोटीफिकेशन काढलेले नाही. तर आपल्याला कदाचित पुन्हा जकात लावायला लागेल किंवा सेस रद्द होईल. आपण लक्षात घेतले पाहिजे की, शासन गेली पाच वर्षे महाराष्ट्रातल्या व्यापाऱ्यांना असे आश्वासन देत आली की, आम्ही जकात रद्द करणार आहोत आणि त्याला पर्यायी उत्पन्न आम्ही काय करायचे आहे ते ठरवणार आहोत. संपुर्ण महाराष्ट्रामध्ये देशातल्या कानाकोपऱ्यामध्ये जकातीच्या संदर्भातले वातावरण निर्माण झाले. वेगवेगळ्या राज्याने अगोदर जकात रद्द केली. महाराष्ट्र राज्य शेवटचे राज्य आहे की त्यांनी जकात रद्द केली. जकात रद्द करताना त्यांनी सरळ सरळ डिक्लेअर केले की, आता जकात रद्द झाली. व्यापाऱ्यांमध्ये ही भुमिका आहे की, त्यांनी शासनाच्या निर्णयाचे स्वागत केले. आणि आपण अशी जर भुमिका घेउन चाललो की, उद्या शासन तो निर्णय मागे घेणार आहे आणि म्हणून आपण ते नोटीफिकेशन येण्यासाठी थांबूया. तर ही गोष्ट चुकीची आहे. जर महानगरपालिकेला हे ठरवायचे झाले की, उद्या जकात जरी लागू झाली तरी आम्ही सेस लावणार. व्यापाऱ्यांना त्रास नको तरी शासन तुम्हाला थांबवणार नाही. हे पण तुम्हाला सांगतो आणि उपकराच्या बाबतीत शासनाने आपल्याकडे जी माहिती दिलेली आहे संमजा उपकर वसुली कमी झाली १५ टक्के कमी झाली तर शासन तुम्हाला अनुदान देणार आहे मुळात शासनाने महानगरपालिका स्थापन करताना सुप्रिम कोर्टामध्ये एक ॲफिडेव्हीट दाखल केले होते. एका केसमध्ये एस एल पी मध्ये त्यांनी असे ॲफिडेव्हीट दाखल केले होते की, असा आरोप लावला होता की, महानगरपालिका आल्यानंतर वाढीव जकात होईल. आणि इतर वेगवेगळे टॅक्सेस वाढतील तर महाराष्ट्र शासनाने असे ॲफिडेव्हीट दाखल केले की आम्ही जेवढ्या जेवढ्या महानगरपालिका स्थापन करतोय त्या सगळ्या महानगरपालिकांना पहिल्या पाच वर्षात कुठलीही जकात लावणार नाही. ज्यांचे जकातीचे उत्पन्न चालू होते त्यांना पहिल्या वर्षाला १०० टक्के अनुदान आम्ही देउ. जकातीच्या उत्पन्नाचे एवढे अनुदान आम्ही देउ. दुसऱ्या वर्षाला ६६ टक्के देउ आणि नंतरच्या वर्षांना ३३ टक्के कमी करून देउ. अशाप्राकारचे ॲफिडेव्हीट सादर केले होते. परंतु, शासनाने ते पाळले नाही. हे सुप्रीम

कोर्टातल्या ॲफिडेव्हीट बद्दल मी सांगतो. आणि त्यावेळी त्या व्यापाऱ्यांमध्ये तशी भुमिका झाली. आणि आपल्या महानगरपालिकेने तेव्हापासुन जकात लावला. जकातीचे उत्पन्न हे महानगरपालिकेचे उत्पन्न आहे. म्हणून आपल्या सगळ्यांना असे वाटते की, जकात रहावी की ते उत्पन्न रहावे. एकीकडे तुम्ही असा विचार करता आणि दुसरीकडे ७० टक्के व्यापारी हे शहर सोडून गेलेले आहेत. ही पण बाब तुम्ही लक्षात घ्या. ७० टक्के जेव्हा व्यापारी हे शहर सोडून जातात त्या जकातीच्या ठेकेदाराच्या जाचाला, ठेकेदार जो जाच निर्माण करतो त्रास देतो त्याच्या त्रासाला कंटाळून लोक जकात कर भरायला कंटाळत नाही, पण अवाढव्य दराने एखाद्या वस्तुचे बिल असेल तर कधी प्रशासनाने याबाबी त्यांच्यावर लादल्या नाहीत. एक्साईज गेट पासमध्ये त्या मालाची व्हॅल्यु असते त्याच्यापेक्षा अथोन्टीक पुरावा काय असु शकतो. व्हॅल्युएशनचा एखाद्या मालाचा व्हॅल्युएशनचा पुरावा एखाद्या प्रा. लि. कंपनिच्या एक्साईज गेट पास वर त्या मालाची किंमत लिहिलेली असते. ठेकेदार ते मानत नाही. अशा पद्धतीने या शहरातुन व्यापारी निघुन गेले. जर शहरातुन इंडस्ट्री गेली तर तुम्हाला जो डबल टॅक्स इंडस्ट्रीयल टॅक्स पाण्याचा दर, जो डबल मिळतो आणि त्याच्याशिवाय त्यांचे इतर जे उत्पन्न आहे ते जाणारच आहे. सेस भरायला व्यापाऱ्यांचा कुठलाही विरोध नाही. म्हणून आपण अजुनही मला तर आश्चर्य वाटते की, आपण अजुन सेसची मिटींग लावणार आहात ती सेसची तयारी करावी. खर म्हणजे आज जेव्हा हा मुदतवाढीचा विषय आज त्याच्या अगोदरच प्रशासनाने हा विषय महापौरांना द्यायला पाहिजे होता किंवा दिला असेल. तर महापौरांनी ती सभा लावायला पाहिजे होती की, तुम्ही सेसच्या संदर्भातील काय तयारी केलेली आहे?त्याचा आढावा घेण्याची तयारी करावी. आयुक्त साहेब नविन आले म्हणून आमच्या सुद्धा आशा उंचावल्या पुर्वीच्या आयुक्तांनी काय केले ते मला सांगायचे नाही. मी कधी बोललो ही नाही यापुढेही बोलणार नाही. पण आपल्याकडून त्या अपेक्षा आहेत म्हणून ह्या ३९ दिवसामध्ये आपल्याला खरी मॅरेथॉन स्पर्धा करायची आहे. नाहीतर ३९ दिवसांनंतर आम्हाला पुन्हा याच निर्णयावर यावे लागेल.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब, आपण चांगली भुमिका मांडली आहे. ३९ दिवसानंतर आपल्याला उपकराच्या तयारीला सुद्धा लागायचे आहे आणि १ लाख जवळ जवळ इस्टॅब्लिशमेंट आपल्या मिरा भाईंदर शहरात आहे. म्हणजे रोजचे आपण २००० टेस्ट केले तरी ३९ दिवसांमध्ये ९० हजारच होणार आहेत. ८० हजार व २० हजार तरी राहणार आहे. म्हणजे रोजचे जवळ जवळ १२५० व्यापाऱ्यांचे आपल्याला रजिस्ट्रेशन करावे लागेल यामध्ये शंका नाही की, व्यापाऱ्यांचा सुद्धा आपल्याला यामध्ये सहभाग लागणार आहे. त्यांनी समोर येउन पुढाकार घेउन रजिस्ट्रेशन करून घ्यायचे. कुठल्याही प्रकारचे भविष्यामध्ये त्रास होता कामा नये. कारण उपकर अशी बाब आहे की, एखाद्या माणसाने आज भरले नाही तरी दोन वर्षानंतर त्याला भरायलाच लागणार आहे. तो काय सुटणार नाही. तर व्यापाऱ्यांनी समोर येउन पुढाकार घेउन आपल्या मालाला जेवढी आवक झालेली आहे त्याच्या नियमाप्रमाणे उपकर मिरा भाईंदर महानगरपालिकेत जमा करावे त्यासाठी आपण विशेष एक मिटींग लावू. आणि काहीतरी नक्की करू की, कुठल्याही प्रकारे व्यापाऱ्यांना त्रास नको उपकर व्यवस्थित शांततेने व्हावे याकरिता मिरा भाईंदर शहरातील आपण नक्की दखल घेउ.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर साहेब, मित्र पक्षाने जे विचार मांडले त्याबाबत त्यांचे जे मत आहे तर याच्यामध्ये मला वाटत नाही की, जनतेचा किंवा व्यापाऱ्यांचा काय फायदा झालेला आहे. मला तरी वाटते की या ठेकेदाराचा फायदा करण्यासाठी सगळे षडयंत्र आहे.हे सांगतात की, त्या लोकांच्या जाचाला कंटाळले आणि ३९ दिवसामध्ये लोकांची पिळवणूक करतील. ही पिळवणूक व्हायला नको हे वक्तव्य मलाही आवडले. पण याच्यामध्ये आपण जी जुन्या दराने वसुली करणार आहात त्याच्यामध्ये ठेकेदाराला महागाईच्या दरात आपण जर महागाईचा दर बघितला तर आपण उदाहरणार्थ दिले स्टील आणि लोखंड तर अगोदर ४० किलो दराने १० टन लोखंड आपल्या मिरा भाईंदरमध्ये येत होते. त्याचे ४० हजार वर ४ टक्के किवा ३ टक्के या हिशोबाने आकारत होते. आता ५० चा दर झाला त्या हिशोबाने त्यांना पण वाढीव पैसे मिळणार आहेत तर ह्याच्यामध्ये त्यांना कमी करण्याचा प्रश्न कुठे येतो की, त्यांना कमी पेसा वसुल होणार आहे. मला तरी वाटते त्यांच्याकडे १० टक्के जकात जास्त......

**मा. महापौर :-**

आपण १० टक्के वाढवतोय.

**बर्नड डिमेलो :-**

वाढवतोय तर त्या हिशोबाने कमी करण्याचे कसे आणतोय.

**मा. महापौर :-**

कमी कुठे केले आहे? आपण १० टक्के वाढवतोय. १० टक्के जुन्या दराप्रमाणे आज जी रक्कम तो भरतोय माझे म्हणणे असे आहे की, या महिन्यात जर ८ करोड रू. एका महिन्यामध्ये भरणार आहे. तर पुढच्या महिन्यामध्ये तो १० टक्के प्रमाणे ८ करोड ८० लाख रू. भरणार आहे. त्याला आपण १० टक्के वाढवतोय कमी करत नाही.

**जुबैर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, आपण आता सांगितले की, कमीत कमी १ लाख व्यापारी या शहरामध्ये आहेत. उद्याच्या २२ तारखेची ते वाट बघत आहेत. लोकांमध्ये अशी एक चर्चा होती की, मी एक व्यापारी आहे. स्थायी समितीचा विषय किंवा मला माहिती आहे तर मी ही २२ तारखेची वाट बघत होतो की हे ऑक्ट्रॉय या शहरामधून संपतोय. आयुक्त साहेबांनी तशी आपल्याला माहिती दिली की, उपकराचे अजुन नोटीफिकेशन आलेले नाही. १५ दिवसात येईल किंवा येणाऱ्या ६ महिन्यात येईल कमीत कमी व्यापाऱ्यांना त्याच्याकरिता मानसिक तयारी तरी होउ द्या. एकच नक्की करा की, आपल्याला करायचे काय आहे? आपण फक्त एका महिन्याची मुदत वाढ देत आहात. तर परत १ महिन्यानंतर परत या विषयाबद्दल या चर्चेकरिता आपण बसणार आहोत. मा. महापौर साहेब मी स्वतः व्यापारी आहे मी स्वतः १५ दिवस किंवा महिनाभर मला जो माल मागवायचा होता या शहरामध्ये तो मी मागवत नाही. कारण मी वाट बघतोय. कारण मी व्यापारी आहे. शहराच्या दृष्टीकोनातुन विचार केला तर एक नगरसेवक, एक लोकप्रतिनिधी म्हणून या शहराचे उत्पन्न वाढले पाहिजे म्हणून मला हे असे करणे चुकीचे आहे. पण व्यापाऱ्याच्या दृष्टीकोनातुन पैसा वाचविण्याचा प्रयत्न करत आहे. आणि माझ्यासारखे असे कितीतरी व्यापारी असतील त्यांनी हेच केले होते. आता त्यांना कदाचित परत माल मागवावा लागेल. जकात भरावी लागेल. परत महिन्याभराची मुदतवाढ दिली आहे. उद्या ते वर्तमान पत्रामध्ये जातील व परत महिनाभर वाट बघतील अशा पद्धतीचा कारभार करू नका. आयुक्त साहेब, जे काय असेल.....

**मा. महापौर :-**

आपल्याकडून मुदतवाढ दिलेलीच नाही. अजून गर्व्हमेंटचे नोटीफिकेशन आलेले नाही म्हणून आपण उपकर लावलेले नाही. पण मिरा भाईंदर महानगरपालिकेने मुदतवाढ दिलेली नाही.

**जुबैर इनामदार :-**

साहेब, बाकीच्या बऱ्याच महानगरपालिकेने ३१ मार्च पर्यंत मुदतवाढ घेउन गेले आहेत. जो काही निर्णय असेल तो एकदाच घ्यावा. शहराचे हे जे व्यापारी बंधू आहेत किंवा ते व्यापारी या शहराचे नागरिक आहेत. आपले त्यांच्याकडे काहीतरी दायीत्व आहे. त्यांना स्टीकवर धरू नका. प्रत्येक महिन्याला मुदतवाढ आता चालला ऑक्ट्रॉय, उद्या चाललाय ऑक्ट्रॉय अशा पद्धतीने आपल्या ऑक्ट्रॉय वर बसलेले महारथी लोक आहेत त्यांचा त्रास तुम्हाला आम्हाला सर्वांना माहित आहे. त्यालाही आपल्याला अंकुश लावायचा आहे. म्हणून एकदाच डिसाईड करा की, काय करायचे आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, यामध्ये मला फक्त एकाच गोष्टीचे आनंद वाटला की व्यापराबद्दल सर्वांना आपुलकी वाटली. जेव्हा काल मी त्या एन ओ सी बद्दल बोललो तर माझी टींगल केली. या सभागृहाने टींगल केली. मेडीकलवर टिंगळ केली आणि आज व्यापाऱ्यांबद्दल, त्यांच्याबद्दल विचार करा जे एन ओ सी रेट काल वाढविलेले आहेत त्याचा विचार करा. असे मी अजुनही सांगत आहे. साहेब आपण त्या ठरावामध्ये आज रेट बघा काय वाढ केलेली आहे. आम्ही पण व्यापाऱ्यांची बाजु बोलतोय.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**नगरसचिव :-**

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, "ड" वर्ग महानगरपलिकेचा जकात कर बंद करुन उपकर चालू करण्याचे शासनाने धोरण अवलंबिले आहे. त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने आवश्यकती पुर्व तयारी सुरु केली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचा सन् २००७-०८ सालातील जकात वसुलीचा ठेका दि. २२/०६/२००८ रोजी मध्यरात्री संपणार आहे.

प्रकरणात तत्वतः ३१ जुलै २००८ मध्यरात्री (१ ऑगस्ट २००८) पासुन उपकराची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे. तोपर्यंत महानगरपालिकेने जकात कर वसुली करणे अपेक्षित आहे. महानगरपालिकेकडे कर्मचाऱ्याची संख्या कमी असल्यामुळे महानगरपालिकेकडून जकात कर वसुल करुन घेतल्यास अपेक्षित उत्पन्न मिळणार नाही. त्यामुळे मा.स्थायी समिती ठराव क्र.४२ दि.२९/०२/२००८ व मा.महासभा ठराव क्र.३४ दि.१९/०३/२००८ च्या अन्वये निश्चित केलेल्या दराने व्यापारी व नागरीकांकडून जकात कर वसुली करण्यास आणि अपेक्षित देकार रक्कम रु.९२ कोटी प्रमाणे प्रति हफ्ता येणारी रक्कम रु.१,८४,००,०००/- (रु. एक कोटी चौऱ्याऐंक्षी लाख मात्र) एवढी महानगरपालिकेस नियमित भरण्याच्या अटीवर जकात वसुली ठेकेदार मे. कोणार्क इन्फ्रा.लि. यांना मुदत वाढ देणे योग्य राहील.

सदर मुदतवाढ दि.२३/०६/२००८ ते दि.३१/०७/२००८ पर्यंत ३९ दिवसांसाठी असून या कालावधीसाठी एकूण रक्कम रु.९,८३,०१,३७२/- (रु. नऊ कोटी त्र्याऐंशी लाख एक हजार तिनशे बहात्तर मात्र) एवढी महानगरपालिकेस मिळणार आहे. यास्तव जकात दर वाढीची नोटीस प्रसिध्दी करुन व सदर प्रकरण विशेष महासभेला ठेवून अंतिम मंजुरी घेउन दि.३१/०७/२००८ पर्यंत जकात वसुली ठेकेदार मे.कोणार्क.इन्फ्रा.लि. यांना मुद्त वाढ देउन कार्यादेश देण्यास मा.स्थायी समितीने ठराव क्र. १८ दि.१७/०६/२००८ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सदर ठेकेदार मे.कोणार्क .इन्फ्रा.लि. यांना दि.२३/०६/२००८ ते दि. ३१/०७/२००८ पर्यंत किंवा उपकर लागू होईपर्यंत जकात वसुली करण्यास मुद्त वाढ देउुन कार्यादेश देण्यास विशेष मा. महासभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्री. मिलन गो. पाटील**

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील यांनी सुचना मांडली ती खालील प्रमाणे.**

जकात वसुली ठेकेदार मे. कोणार्क इन्फ्रा. लि. यांना दि. ३१/७/२००८ पर्यंत जकात वसुलीची ठेक्याची मुदतवाढ देताना कोणतीही जकात दरवाढ न देता मागील दराप्रमाणेच ठेकेदाराने जकात वसुली करावी. ठेकेदाराने त्यामध्ये नियमाप्रमाणे १० टक्के जास्त वसुलीची रक्कम महानगरपालिकेस द्यावी.

मुदतवाढीच्या काळात ठेकेदाराने आयातिकांवर कोणतेही जकात दरवाढ / गैरवसुली केल्यास त्याच्यावर कारवाई करण्यासाठी एक समिती नेमण्यात यावी. त्यामध्ये सर्व पक्षांचे १ सदस्य घेउन त्या समितीचे प्रमुख उपायुक्त यांना नेमण्यात यावे व मुख्य जकात नाक्यावर तक्रारींची नोंद घेण्यासाठी क्लास-२ दर्जाच्या अधिकाऱ्याची २४ तास नेमणूक करावी.

**सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील** **अनुमोदन :- श्री जुबेर इनामदार**

सन्मा. सभागृहाने दिलेल्या मान्यतेनुसार मागील रक्कमेत १० टक्के वाढ करुन कोणतीही जकात दरवाढ न करता तसेच मुळ ठरावाचे सुचक श्री. जयंत पाटील यांनी मांडलेल्या ठरावानुसार सदर ठेकेदार मे.कोणार्क. इन्फ्रा.लि. यांना दि. २३/०६/२००८ ते दि. ३१/०७/२००८ पर्यंत किंवा उपकर लागू होईपर्यंत जकात वसुली करण्यास मुदत वाढ देण्यात यावी.

**मा. महापौर :-**

सदरचा ठराव वाचून कायम करण्यात येत आहे. ह्याच्यामध्ये मी अजुन एक सुचना केलेली आहे की, त्याला जुन्या रेटप्रमाणे १० टक्के प्रमाणे करून घ्या.

**नगरसचिव :-**

ते आलेले आहे.

**मा. महापौर :-**

खर म्हणजे ठेकेदार १-१ दिवस, २-२ दिवस गाड्या उभ्या करतात आणि १० पट दंड वसुल करतात. तर आता सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील ह्यांनी सांगितले की, आपला क्लास २ ऑफिसर त्या नाक्यावर असणार आहे.

**अनिल सांवत :-**

आता तुम्ही ह्याच्यापुढे करणार आहोत पण ह्याच्या पूर्वी दंडात्मक रक्कम किती वसुल झाली आहे हे मी विचारले हाते?

**मा. महापौर :-**

त्याची ही आपल्याला माहिती देतो.

**अनिल सावंत :-**

लाखो रुपयाचा आणि करोडो रुपयाचा माल पडला आहे. त्याच्या बाबतीत महानगरपालिकेची काय भूमिका आहे?

**मा. महापौर :-**

सर्व व्यापारी बंधू बाहेर उभे आहेत. यापूढे आपल्याला कुठल्याही प्रकारचा जकातदाराकडून त्रास झाला तर जकात वसुली करण्याकरिता आमचे महापालिकचे वर्ग -२ चे अधिकारी जकात नाक्यावर असणार आहेत. आपण त्यांच्याकडे तक्रार करावी. अन्यथा महापालिकेमध्ये तक्रार करावी. आपल्याला नक्कीच त्याच्यामध्ये कुठच्याही प्रकारचा त्रास होणार नाही. यापुढे भविष्यात महापालिका विशेष काळजी घेणार आहे.

**एस. ए. खान :-**

आपण तिथे सुचना फलक लावा की, असे असे तक्रार निवारण केंद्र येथे आहे. आपली जी केबिन आहे ती पाठीमागे टाकली आहे. ती मेन रोडवर ठेवा.

**मा. महापौर :-**

श्री. खतगावकर साहेब, सन्मा. सदस्य अनिल सावंत यांच्या प्रश्नाचे उत्तर द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या जकात नियमामध्ये अपराध सिध्द झाल्यानंतर दंड लावावे. अशी तरतुद असल्याने वेळोवेळी याबाबत मा. महासभेमध्ये चर्चा झालेली आहे. त्यामध्ये सरळ त्या प्रकरणामध्ये डायरेक्ट दंड लावण्याचे अधिकार महासभेला किंवा मा. आुयक्तांना नाही. कोर्टामध्ये ते सिध्द झाल्यानंतर दंड लावावे असे प्रकरण असल्यामुळे.......

**अनिल सावंत :-**

साहेब, आपण माझा मुद्दा समजला नाही. मिनटाईम जो ऑक्ट्रॉय ठेकेदाराने वसुल केलेला आहे दंडात्मक त्यामधून किती रक्कम तुमच्याजवळ जमा झाली?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मागच्या आर्थिक वर्षामध्ये एकूण ६८ प्रकरण आपल्याकडे आले होते. त्यामध्ये ६४ प्रकरणांचा निकाल झालेला आहे. ४ प्रकरण पेन्डीग आहेत. त्यात दोन प्रकरण कोर्ट मॅटरची आहेत आणि दोघांचे निर्णय करणे बाकी आहेत. ते दोन दिवसात केले जाईल. यामध्ये आजपावतो ४ लाख ७ हजार रु. दंडात्मक रक्कम आपण जमा केलेली आहे.

**अनिल सावंत :-**

आता जो माल पडलेला आहे, ठेकेदाराने तो माल जप्त केलेला आहे. त्याच्यावर महानगरपालिका कार्यवाही करणार?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जे दोन प्रकरचे मॅटर आहे त्याचा दोन दिवसात निर्णय करुन त्याला परत दिला जाईल.

**अनिल सावंत :-**

धन्यवाद.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतोय. आयुक्त महोदय आपण जकात नाक्यावर तिथे जे अधिकारी देणार आहात ते सक्षम अधिकारी द्या. कारण तिथे आजपर्यंत जे अधिकारी दिले गेले ते फक्त तिथे दाढी करण्याचे काम करतात. तिथे न्याय करत नाही. माझी माहिति अशी आहे की, दोन वेळा रात्री स्वतः महापौर महोदय तिथे निवारण करण्यासाठी गेले होते. त्यांना विचारा.

**मा. महापौर :-**

गेलो होतो.

**आसिफ पटेल :-**

तर महापौरांना तिथे जावे लागते ही शरमेची बाब आहे. तर आमची सदस्यांची दखल घेतली जाईल का? याचा विचार करा. या शहरात अधिकाऱ्यांचे असे चालले आहे की, अधिकारी जे करतील ती पूर्व दिशा. महापौरांचेही चालत नाही. सदस्यांचेही चालत नाही. या शहराची शोकांतिका आहे की, "आंधळा दळतोय आणि कुत्र. पिठ खातयं" एखादा व्यक्ती बांधकाम करतोय, दुसऱ्यावर एम.आर.टी.पी. दाखल होते हे काय चालले आहे. आपण सक्षम आहात का? जर आपण सक्षम नसाल तर खुर्च्या सोडा. अधिकारी सक्षम नसतील तर त्यांना येथून बदला. ठराव घ्या. मी तर गेल्या वेळेला म्हणालो होतो की, भाउबंदांच्या मेहेरबानीशी कुत्रा पंढरपुरला गेला. पंढरपुरला का इथला मिरा भाईंदरचा कुत्रा जाणार नाही. आपण लक्ष द्या की, काय चाललेले आहे. जकात नाक्यावरती किती अंधाधुंदी कारभार आहे. प्रत्येक दिवसाला पाच फोन असतात. मुद्दाम बसून राहतात. गाडी पुढे गेली की, शिट्टी मारुन गाडी अडवतात व सांगतात की, गाडी पळून जात होती असे करुन त्याला धरुन आणतात. किती दंड भरणार? या शहरातील जनता त्रस्त आहे. ह्याच्यावर आपण लक्ष द्या. आयुक्त महोदय तिथे महापौरांना जावे लागते. आपण नविन आलेला आहात. आपण लक्ष द्या आपले सगळे अधिकारी माजलेले आहेत. आता माझ्या मुलावर आयुक्त महोदयांनी एम.आर.टी.पी. चा गुन्हा दाखल करण्यासाठी प्रपोझल पाठवलेले आहे. त्याचा काडीमात्र संबंध नाही. मी माझ्या पत्रात तसा उल्लेख केलेला आहे. तरी देखील आजपर्यंत माल मागे घेतलेला नाही. आदरणीय श्री. दिवटे साहेब काही ऐकायला तयार नाही. गेल्या वेळेस मी म्हणालो की, तुमच्या पत्राची तीन तासात दखल घेतली. का म्हणालो ते ऐकून घ्या. मी पत्र देवून कमीत कमी दोन महिने झाले आहेत. त्या पत्राचे अजून उत्तर नाही. माझ्या मुलाचा त्या बांधकामाशी काडीमात्र संबंध नाही आणि त्याच्यावर एम.आर.टी.पी. दाखल करण्यासाठी प्रपोझल तिथे पाठविले. कोणी पाठविले? का पाठविले? त्याची चौकशी केली का? मी न्यायालयामध्ये श्री. दिवटे साहेबांवर गुन्हा दाखल करण्यासाठी परवानगी मागत आहे आणि तिथले जे प्रभाग अधिकारी आहेत त्यांच्याशी मी संभाषण साधले ते बोलले की, तुमच्या मुलाचा संबंध नाही असा प्रपोझल मी महापालिकेला पाठविलेला आहे. या शहरात काय चालले आहे? याचे उत्तर द्या.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, सन्मा. सदस्य आसिफ पटेल यांनी जो मुद्दा उपस्थित केला तर त्यांचा मुलगा असू दे किंवा इतरांचा असू द्या. एखाद्याच्या दृष्टीने त्यांच्यावर एम.आर.टी.पी. गुन्हा दाखल करणे हे खर म्हणजे मोठा गुन्हा आहे. ज्या अधिकाऱ्याने गुन्हा दाखल केला आहे त्याच्यावर गुन्हा दाखल करायला पाहिजे. आपण विशेष याची काळजी घ्या.

**आसिफ पटेल :-**

आपण आयुक्त आहात की, श्री. दिवटे साहेब आयुक्त आहेत हे समजू द्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आसिफ पटेल आपण सांगितले की, मी रात्री दोन दोन वेळा गेलेलो आहे. तर मला ज्यावेळी व्यापाऱ्यांचा फोन येतो तेव्हा मी जातो.

**चंद्रकांत वैती :-**

सभा जकातीची आहे की, एम.आर.टी.पी. ची आहे? एम.आर.टी.पी. दाखल होते म्हणजे कुठेतरी इललिगल कन्स्ट्रक्शन केले असेल. मग ते तुम्ही तोडत का नाही? स्टे ची वाट का बघता? त्यांचे असे म्हणणे नसेल तर त्यांचे नाव ठेवू नका. म्हणून ते कस्ट्रक्शन तोडून टाका.

**आसिफ पटेल :-**

होय. चोराला सोडून संन्याशाला फाशी देउ नका एवढेच माझे म्हणणे आहे.

**नगरसचिव :-**

सदरचा ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २५:-**

जकात कर वसूलीचा कालावधी संपल्यानंतर मुदतवाढ देण्याबाबत. (दि. १७/०६/२००८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण क्र. १८)

**ठराव क्र. २० :-**

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, “ड” वर्ग महानगरपलिकेचा जकात कर बंद करुन उपकर चालू करण्याचे शासनाने धोरण अवलंबिले आहे. त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने आवश्यकती पुर्व तयारी सुरु केली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचा सन् २००७-०८ सालातील जकात वसुलीचा ठेका दि. २२/०६/२००८ रोजी मध्यरात्री संपणार आहे.

प्रकरणात तत्वतः ३१ जुलै २००८ मध्यरात्री (१ ऑगस्ट २००८) पासुन उपकराची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे. तोपर्यंत महानगरपालिकेने जकात कर वसुली करणे अपेक्षित आहे. महानगरपालिकेकडे कर्मचाऱ्याची संख्या कमी असल्यामुळे महानगरपालिकेकडून जकात कर वसुल करुन घेतल्यास अपेक्षित उत्पन्न मिळणार नाही. त्यामुळे मा.स्थायी समिती ठराव क्र.४२ दि.२९/०२/२००८ व मा.महासभा ठराव क्र.३४ दि.१९/०३/२००८ च्या अन्वये निश्चित केलेल्या दराने व्यापारी व नागरीकांकडून जकात कर वसुली करण्यास आणि अपेक्षित देकार रक्कम रु.९२ कोटी प्रमाणे प्रति हफ्ता येणारी रक्कम रु.१,८४,००,०००/- (रु. एक कोटी चौऱ्याऐंक्षी लाख मात्र) एवढी महानगरपालिकेस नियमित भरण्याच्या अटीवर जकात वसुली ठेकेदार मे. कोणार्क इन्फ्रा.लि. यांना मुदत वाढ देणे योग्य राहील.

सदर मुदतवाढ दि.२३/०६/२००८ ते दि.३१/०७/२००८ पर्यंत ३९ दिवसांसाठी असून या कालावधीसाठी एकूण रक्कम रु.९,८३,०१,३७२/- (रु. नऊ कोटी त्र्याऐंशी लाख एक हजार तिनशे बहात्तर मात्र) एवढी महानगरपालिकेस मिळणार आहे. यास्तव जकात दर वाढीची नोटीस प्रसिध्दी करुन व सदर प्रकरण विशेष महासभेला ठेवून अंतिम मंजुरी घेउन दि.३१/०७/२००८ पर्यंत जकात वसुली ठेकेदार मे.कोणार्क.इन्फ्रा.लि. यांना मुद्त वाढ देउन कार्यादेश देण्यास मा.स्थायी समितीने ठराव क्र. १८ दि.१७/०६/२००८ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सदर ठेकेदार मे.कोणार्क .इन्फ्रा.लि. यांना दि.२३/०६/२००८ ते दि. ३१/०७/२००८ पर्यंत किंवा उपकर लागू होईपर्यंत जकात वसुली करण्यास मुद्त वाढ देउन कार्यादेश देण्यास विशेष मा. महासभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्री. मिलन गो. पाटील**

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील यांनी सुचना मांडली ती खालील प्रमाणे.**

जकात वसुली ठेकेदार मे. कोणार्क इन्फ्रा. लि. यांना दि. ३१/७/२००८ पर्यंत जकात वसुलीची ठेक्याची मुदतवाढ देताना कोणतीही जकात दरवाढ न देता मागील दराप्रमाणेच ठेकेदाराने जकात वसुली करावी. ठेकेदाराने त्यामध्ये नियमाप्रमाणे १० टक्के जास्त वसुलीची रक्कम महानगरपालिकेस द्यावी.

मुदतवाढीच्या काळात ठेकेदाराने आयातिकांवर कोणतेही जकात दरवाढ / गैरवसुली केल्यास त्याच्यावर कारवाई करण्यासाठी एक समिती नेमण्यात यावी. त्यामध्ये सर्व पक्षांचे १ सदस्य घेउन त्या समितीचे प्रमुख उपायुक्त यांना नेमण्यात यावे व मुख्य जकात नाक्यावर तक्रारींची नोंद घेण्यासाठी क्लास-२ दर्जाच्या अधिकाऱ्याची २४ तास नेमणूक करावी.

**सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील** **अनुमोदन :- श्री जुबेर इनामदार**

सन्मा. सभागृहाने दिलेल्या मान्यतेनुसार मागील रक्कमेत १० टक्के वाढ करुन कोणतीही जकात दरवाढ न करता तसेच मुळ ठरावाचे सुचक श्री. जयंत पाटील यांनी मांडलेल्या ठरावानुसार सदर ठेकेदार मे.कोणार्क. इन्फ्रा.लि. यांना दि. २३/०६/२००८ ते दि. ३१/०७/२००८ पर्यंत किंवा उपकर लागू होईपर्यंत जकात वसुली करण्यास मुद्त वाढ देण्यात यावी.

**ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**शशिकांत भोईर :-**

खारी गावातील रहिवाशी कै. सतिश सदानंद पाटील वयाच्या ३५ व्या वर्षी हदय विकाराच्या तिव्र झटक्याने दि. १९/०६/२००८ रोजी निधन झालेले आहे. तसेच गेल्या ७५ वर्षातील मराठी रंगभुमी आणि सिनेनेते जिवंत इतिहास असणारे जेष्ठ अभिनेते मा. चंद्रकांत गोखले यांचे शुक्रवार दि. २०/६/२००८ रोजी पाउणे नउच्या सुमारास हदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांची ख्याती अशी आहे की ते अभिनेता असून त्यांना मिळणाऱ्या मानधनातून काहीसा हिस्सा अपंग समिकांसाठी बाजूला ठेवून देत असत. त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे. त्यांच्या मृत्याम्यास शांती मिळण्यासाठी आपण स्तब्ध उभे रहावे.

**नगरसचिव :-**

सर्वांनी जागेवर दोन मिनिटे उभे राहून मृत्याम्यास श्रध्दांजली वाहायची आहे.

(सभागृहात दोन मिनिटे शांतता राखण्यात आली.)

**दुखवठा ठराव २१ :-**

खारी गावातील रहिवाशी कै. सतिश सदानंद पाटील वयाच्या ३५ व्या वर्षी हदय विकाराच्या तिव्र झटक्याने दि. १९/०६/२००८ रोजी निधन झालेले आहे. तसेच गेल्या ७५ वर्षातील मराठी रंगभुमी आणि सिनेनेते जिवंत इतिहास असणारे जेष्ठ अभिनेते मा. चंद्रकांत गोखले यांचे शुक्रवार दि. २०/६/२००८ रोजी पाउणे नउच्या सुमारास हदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर अनुमोदन :- श्रीम. सुनिता शशिकांत भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी, कर्मचारी वर्ग, पत्रकार बंधू, प्रेक्षक आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. १२.१५ वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**